**नलिनी मलानी**

**वेळेची नाजूकता**

क्युरेटर: पूजा वैश

आपल्या कलाकृतींमध्ये चित्रकला, नाटक, डिजिटल माध्यम आणि चित्रपट अशा अनेक कलामाध्यमांचा नाविन्यपूर्ण मिलाफ घडवून आपली स्वतंत्र दृश्यकला शैली निर्माण करणाऱ्या नलिनी मलानी एक अग्रगण्य चित्रकार आहेत. त्यांच्या कलाकृतींच्या मांडणीमध्ये आकारात बदल घडवणे, पृष्ठभागावर पदार्थ पसरवणे, काही गोष्टी पुसून टाकणे, स्थीर चित्रे जलद गतीने संगणकाद्वारे दाखवून हालचालींचा भ्रम निर्माण करणे (ॲनिमेशन), एकावर दुसरी प्रतिमा ठेऊन कलाकृती निर्माण करणे, अशा विविध शैलींचा उत्तम वापर केल्याचे आढळते. त्यांच्या कामात सतत एक बदलाव असतो जो कलेतील पात्रांच्या प्रस्थापित गुणधर्मांमध्ये उलथापालथ घडवून आणतो. मलानी यांच्या कलाकृतींमध्ये दैनंदिन जीवन, ऐतिहासिक घटना, पौराणिक कथा, साहित्य आणि कला यांतील पात्रे सातत्याने आढळतात. कलाकृतींमधील ही सर्व पात्रे समाजातील महिलांचे प्रतिनिधित्त्व व त्यांची भूमिका याविषयी पुनर्विचार करण्यास भाग पाडतात. आपल्या कारकिर्दीतील सहा दशकांहून अधिक काळ मलानी यांनी सातत्याने नवीन माध्यमे आणि तंत्र याद्वारे नवनवीन प्रयोग केले आणि आपली स्वत:ची स्वतंत्र दृश्यकला शैली विकसित केली.

हे प्रदर्शन म्हणजे १९६० आणि १९७० च्या दशकात मलानी यांनी केलेल्या रचनात्मक कामांचे पहिले सादरीकरण आहे. या प्रदर्शनात मलानी यांच्या शंभरपेक्षा अधिक कलाकृती असून यापूर्वी कधीही प्रदर्शित न झालेल्या ऐंशी कलाकृती आपल्याला पहायला मिळतात. एक कलाकार म्हणून मलानी यांची जडणघडण कशी झाली याचा अंदाज या कलाकृतींमधून आपल्याला येऊ शकतो. त्यांच्या कलाकृतींचे पुनर्वाचन हा भारतीय कला इतिहासाच्या वाटचालीसंदर्भात एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

‘वेळेची नाजूकता’ (‘द फ्रॅजिलिटी ऑफ टाईम’) या प्रदर्शनात एका नवनिर्मित राष्ट्रातील एका तरुण स्त्री कलाकाराचे चित्रण रेखाटले आहे. नलिनी मलानी ह्यांचा जन्म १९४६ मध्ये झाला असल्याने त्या भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या विचारवंत व्यक्तिमत्त्वांपैकी एक होत्या. त्यांनी पाश्चात्त्य आधुनिकतावादी विचारांपासून फारकत घेऊन आपल्या दृश्यकलेच्या माध्यमातून स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक आणि राजकीय वास्तव प्रतिबिंबित केले. विचारधारणेतील हा बदल १९६५ ते १९६७ या कालावधीत चितारलेल्या जलरंगातील चित्रांपासून ते १९८१ मधील ऐतिहासिक 'प्लेस फॉर पीपल' या प्रदर्शनातील त्यांच्या तैलचित्रांपर्यंत मलानी ह्यांच्या कलाप्रवासात दिसून येतो.

जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत असताना, १९६४ ते १९६९ दरम्यान मलानी यांना चित्रकार, नाटकात काम करणारी नटमंडळी, नर्तक आणि संगीतकार यांची कर्मभूमी असणाऱ्या भुलाभाई मेमोरियल इन्स्टिट्यूटमध्ये स्टुडिओ मिळाला. येथे त्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या पारंपारिक आणि अमूर्तता निषिद्ध मानलेल्या शिक्षणपद्धतीमध्ये अस्वीकृत असलेल्या आंतरविद्याशाखीय कल्पना आणि सौंदर्यशास्त्र यांचा वेध घेतला. सुप्रसिद्ध कलाकार अकबर पदमसी यांच्या १९६९ ह्या वर्षाच्या बहुविद्याशाखीय व्हिजन एक्सचेंज वर्कशॉप (VIEW) मध्ये मलानी सहभागी झाल्या आणि प्रायोगिक चित्रपट आणि कॅमेरारहित छायाचित्रांची त्यांनी मालिका बनविली. अशा प्रकारच्या माध्यमांचा वापर कलाक्षेत्रात त्याकाळी पूर्णपणे नवीन होता. पुढे १९७० ते १९७२ या कालावधीत फ्रेंच सरकारची शिष्यवृत्ती मिळवून मलानी यांनी पॅरिसमध्ये विविध चित्रपट सिद्धांत आणि समकालीन विद्वानांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. हा अनुभव मल्टीमीडिया क्षेत्रातील त्यांच्या अभिव्यक्तीला साकारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला.

मलानी ह्यांचा कामातील कट्टरपणाचा प्रभाव त्यांच्या सुरुवातीच्या काळातील कलाकृती निर्मितीच्या वेगवेगळ्या ठिकाणांमुळे झाला आहे. यामुळे औपचारिक शिक्षणाच्या पलीकडे असलेल्या कलाकारांच्या गटांची झलक मिळते, ज्यांच्यामुळे भारतीय दृश्यकलामध्ये नवीन आयाम जोडले गेले.

हे प्रदर्शन एका महिलेच्या दृष्टीकोनातून शहर आणि समाज याविषयीचे मलानी ह्यांचे विकसित होत गेलेले विचार प्रतिबिंबित करते. मखमली कापडाची छायाचित्रे आणि नैसर्गिक घटकांवर आधारित फोटोग्रॅम्स स्त्रीत्त्वाला अमूर्तरीतीने दर्शविते. तर १९७०च्या दशकात चितारलेल्या कॅनव्हासवरील चित्रांमध्ये शहरी जीवनातील गुंतागुंतीच्या परिस्थितीमध्ये नायिकेच्या रूपात चित्रित केलेली मुलगी आपल्याला दिसते. समाजातील स्तर दर्शविणाऱ्या त्यांच्या 'हिज लाइफ' या मालिकेवर मुंबईच्या लोहार चाळ परिसरात असलेल्या त्यांच्या स्टुडिओचा प्रभाव जाणवतो.

या प्रदर्शनाच्या निर्मितीसाठी नलिनी मलानी यांच्यासारख्या कलाकारासोबत काम करणे म्हणजे गतकाळातील आठवणींना उजाळा देत चित्रांकडे पाहणे. अनेक आठवणी आणि घटना चित्रित करणारे हे प्रदर्शन नलिनी मलानी यांच्या कारकिर्दीवर प्रभाव टाकणाऱ्या अनेक क्षणांची जाणीव करून देते.